दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

## शरद पवारांची शॅडो कॅबिनेट तयार:महाराष्ट्र पिंजून काढण्याचे दिले आदेश

**मुंबई**–महाराष्ट्रात महायुतीचे सरकार प्रचंड बहुमताने स्थापन झाले व त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात १०० दिवसांच्या कार्यक्रमांचे नियोजन देखील करण्यात आले होते. शंभर दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा देखील गुरुवारी मुख्यमंत्र्यांनी घेतला. आता सरकारच्या या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून 'शॅडो कॅबिनेट'ची निर्मिती करण्यात आली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून शॅडो कॅबिनेट तयार करण्यात आली असून या माध्यमातून राज्य सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. तसेच पक्षाच्या नेत्यांवर विभागवार जबाबदारी देखील देण्यात आली आहे. या नेत्यांना संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश शरद पवारांनी दिले आहेत. या संदर्भातील बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीला आमदार व खासदार उपस्थित होते.संपूर्ण महाराष्ट्र फिरून राज्य सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी जयप्रकाश दांडेगावकर, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, रोहित पवार, एकनाथ खडसे, हर्षवर्धन पाटील यांच्यावर पक्षाने जबाबदारी दिली आहे.

बीड/महाराष्ट्र ● शनिवार दि.१ मार्च २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१२५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# योगेश कदमांची हकालपट्टी करा ॲड.प्रकाश आंबेडकर संतापले

## असंवेदनशील गृहराज्यमंत्री मुख्यमंत्र्यांनी बाजूला करावा

**मुंबई (वृत्तसंस्था)–महाराष्ट्रातील राजकीय व्यवस्था ही लकवा मारल्यासारखी झाली आहे. पुण्यातील घटना यावर राज्य गृहमंत्री योगेश कदम यांचे स्टेटमेंट असंवेदनशील आहे. त्यातून त्यांची मानसिकता दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगेश कदम सारख्या मंत्र्यांना मंत्रिमंडळात का ठेवावं असे म्हणत त्यांचे मंत्रीपद काढून घ्यावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. ते अकोला येथील पत्रकार परिषदेत बोलत होते.आंबेडकर यांनी म्हटले की, योगेश कदम यांनी स्वारगेट अत्याचार प्रकरणी असंवेदनशील वक्तव्य केले, ते दुर्दैवी आहे. अशा घटनेवर सामान्य जनता शोक व्यक्त करते, दिलगिरी व्यक्त करते. परंतु मंत्री पदावर बसलेली व्यक्ती अशा पद्धतीने वक्तव्य करते. त्यातून पोलिसांना आणि आरोपींना सुद्धा बळ मिळते. अशा मंत्र्यांना मंत्रिमंडळात का ठेवावं, हा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:ला विचारावा.**

मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे बाबरी मशीद आणि शीख दंगल झाली त्यावेळी सामान्य माणसाला इजा झाल्यास त्याला शासनाने नुकसान भरपाई द्यावी असे प्रावधान त्यात करण्यात आले. हे प्रावधान असताना संवेदनशीलता शासनामध्ये यावी अशी अपेक्षा त्यामध्ये होती. आज ज्या मंत्र्यांना असंवेदनशीलता दाखवावी वाटते त्यांना मंत्रिमंडळात का ठेवावं, असा सवाल देखील आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे.

सरपंच देशमुख हत्याप्रकरणी दीड हजार पानांचे आरोपपत्र दाखल केले गेले. नीरव मोदीच्या संदर्भात असेच आरोपपत्र इंग्लंडच्या कोर्टात दाखल केलं तेव्हा त्यांनी भारतीय पोलिसांना झापले होते. तुम्ही झहऊ करत आहात की, चौकशी करत आहात ? तेव्हा हे PhD चे डॉक्युमेंट आहे का असा सवाल आंबेडकरांनी या वेळी उपस्थित केला.१८ मार्च रोजी मुंबई उच्च न्यायालयात सायंकाळी ६ नंतर झालेल्या मतदानाच्या संदर्भात त्याचबरोबर झालेले मतदान आणि मोजणीचे मतदान जुळत नसेल, तर याच्या संदर्भातील गाईड लाईन्स निवडणूक आयोगाने काढलेल्या आहेत. त्या पाळल्या गेल्या की नाही याची तपासणी पेटीशनमध्ये होणार असल्याची माहितीहि आंबेडकरांनी पत्रकार परिषदेत दिली.



### आता घरबसल्या करा ई केवायसी !

# पुरवठा विभागाकडून मोबाईल ॲप ग्राहकांच्या सेवेत दाखल

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी घरबसल्या काही मिनिटांतच आपली ई-केवायसी पूर्ण करू शकतात. राज्य सरकारने छखउ च्या सहकार्याने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी चशीर ए-घधउ हे ॲप सुरू केले आहे. यामुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष रास्त भाव दुकानावर न जाता घरबसल्या ई-केवायसी पूर्ण करता येईल. सदस्य ई-केवायसी करू शकतो. आधार क्रमांक मोबाईलशी लिंक असणे आवश्यक. ई-केवायसी कशी करावी? (Step-by-Step मार्गदर्शन) आवश्यक ॲप डाउनलोड करा प्ले स्टोअरला मेरा ई केवायसी मोबाईल ॲप व आधार फेस आरडी सर्विसेस ॲप डाऊनलोड करावा ॲप इन्स्टॉल करून सेटअप करा दोन्ही ॲप इन्स्टॉल करा आणि आवश्यक परवानग्या द्या. मुख्य




वैशिष्ट्ये : घरबसल्या सोप्या पद्धतीने ई-केवायसी करा. फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञानाद्वारे झटपट पडताळणी. रास्त भाव दुकानदार किंवा इतर कोणताही मेरा एक केवायसी ॲप उघडा आणि पुढील स्टेप्स फॉलो करा यात राज्यः महाराष्ट्र निवडा. आधार क्रमांकः टाका आणि आधारशी संलग्न मोबाईलवर आलेला ओटीपी जढझ प्रविष्ट करा. कॅप्चरः फक्त दिलेल्या कोडची नोंद करा. व चेहर्याद्वारे पडताळणी करा(Face muthentication) स्वतःसाठी समोरचा कॅमेरा करून चेहरा स्कॅन करा. सुरू दुसऱ्या व्यक्तीची केवायसी करत असल्यास बॅक कॅमेरा वापरा. स्क्रीनवर दिलेल्या सूचनांनुसार डोळ्यांची उघडझाप करा. सत्यापन पूर्ण होते यशस्वी पडताळणी झाल्यास, लाभार्थ्याची माहिती रास्त भाव दुकानाच्या ई-पॉस मशीनवर दिसेल. याची खात्री करण्यासाठी पमध्ये E-KYC Status तपासा. जर E-KYC Status = ध दिसत असेल, तर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ही सेवा महाराष्ट्रातील लाभार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. महाराष्ट्राबाहेर स्थलांतरित लाभार्थ्यांसाठी खचझऊ घधउ पर्यायाचा उपयोग करावा. शेवटची तारीखः ३१ मार्च २०२५ आहे (परंतु २८ फेब्रुवारी २०२५) पर्यंत जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण करावी. रास्त भाव दुकानदारांनी देखील शिधापत्रिकाधारकांना सहकार्य करून सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी लवकरात लवकर पूर्ण करावी, जेणेकरून कोणत्याही लाभार्थ्यांना अन्नधान्यापासून वंचित राहावे लागू नये. असे आवाहन तहसीलदार नवनाथ वगवाड पुरवठा अधिकारी कांचन कांबळे यांनी केले आहे.

# पत्रकार रवींद्रनाथ ठाकूरांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**आष्टी । प्रतिनिधी**

लोकशाही पत्रकार संघाचे आष्टी तालुका उपाध्यक्ष तसेच वादळ वार्ता चे तालुका प्रतिनिधी श्री रवींद्रनाथ ठाकूर यांचा वाढदिवस आष्टी येथे साजरा करण्यात आला.या प्रसंगी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे, सकाळचे पत्रकार शेख निसार,युवा सोबतीचे पत्रकार जावेद पठाण,राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक सोमनाथ वाळके सर,राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक अण्णासाहेब घोडके सर,स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे संचालक संतोष पोकळे सर,ड संभाजी दहातोंडे साहेब,लोकशाही पत्रकार संघाचे तालुकाध्यसंघटक अशोक धुंदकर,लोकशाही पत्रकार संघाचे सचिव अशोक माने,सहसचिव रंगनाथ काकडे इत्यादी उपस्थित होते.

समाजातील विविध समस्यांवर निर्भिडपणे पत्रकारिता करणारे म्हणून ठाकूर यांची ओळख आहे.सामाजिक कार्यात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे.अभ्युदय म्हणजेच सर्वतोमुखी कार्यातून समाधान शोधणारे हे व्यक्तिमत्व सर्वांसाठी आदर्शवत कार्य करत आहे.

### विनामूल्य म्बुलन्सचा लोकार्पण सोहळा संपन्न

# अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानच्या वतीने विनामुल्य ॲम्बुलन्स

**केज । प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या सामाजिक उपक्रमांतर्गत केज येथे विनामूल्य म्बुलन्सचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. आज जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचे कार्य सध्या सर्वश्रुत आहे यांच्या कार्याच्या मार्फत सत्तर टक्के सामाजिक कार्य व तीस टक्के आध्यात्मिक कार्य या संस्थांच्या माध्यमातून केले जाते त्याच्यामध्ये विनामूल्य म्बुलन्स या वेगवेगळ्या दहा राष्ट्रीय महामार्गावर ५३ म्बुलन्स संस्थांच्या माध्यमातून चालत आहेत विनामूल्य सेवा या म्बुलन्सच्या माध्यमातून केली जाते आज पर्यंत जवळजवळ २५९०० हजार लोकांचे प्राण या अंबुलन्स ने वेगवेगळ्या ठिकानी वाचवलेले आहेत. आत्ताच जानेवारी ४ ते जानेवारी १९ दरम्यान या पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये संस्थांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे झाले बाराशे अठ्ठेचाळीस रक्तदान शिबिराच्या माध्यमातून एक लाख छत्तीस हजार दोनशे सत्तर रक्तकुपिकेचे संकलन महाराष्ट्र शासनाला संस्थांच्या माध्यमातून सुपूर्द करण्यात आलं, त्यानंतर आजता गायत संस्थांच्या माध्यमातून ८४ डेड बॉडी वेगवेगळ्या मेडिकल कॉलेजला सुपूर्द करण्यात आल्या, बारा अवयव दान संस्थांच्या माध्यमातून देण्यात आले, गोरगरिबांना अन्नधान्याचा वाटप असेल, शेतकऱ्यांना कृषी साहित्य, गाय, म्हशी, शेळीचं वाटप असेल, फवारणी पंपाचे वाटप असेल विधवा, परितक्त्या व निराधार महिलाना शिलाई मशीनचे वाटप असेल, वेगवेगळ्या शाळांना शालेय शिक्षण साहित्यच वाटप असेल असे समाज उपयोगी वेगवेगळे बरेच कार्य या संस्थांच्या माध्यमातून केले जाते, तसेच आजही संस्थांच्या माध्यमातून केज येथे म्बुलन्स गाडी चा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

यावेळी केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार, सौ. नमिताताई मुंदडा, उपजिल्हा रुग्णालय केज चे अधिक्षक डॉ केंद्रे , डॉ नागरगोजे ,नगराध्यक्षा सीताताई बनसोड, हारून इनामदार, सूत गिरणीचे चेअरमन श्री. विजयप्रकाश ठोंबरे .रणजीत आडसकर, महादेव सुर्यवंशी, शीतल लांडगे कपिल मस्के ,शरीफ शेख, मोहनराव धपाटे, शिवाजीराव ठोंबरे, शरद इंगळे, नेताजी शिंदे, भगवान केदार, भैया शिंदे , शाम रोडगे ,याच बरोबर स्व-स्वरूप सांप्रदाय जिल्हा सेवा समिती बीड व तालुका सेवा समिती केज. यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.



संपादकीय

# गरिबांचा बँकर ते आश्वासक नेतृत्व

'इफ यू इमॅजिन, इट कॅन हॅपन, इफ यू डोंट इमॅजिन, इट विल नेव्हर हॅपन'. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख, अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांच्या ग्रामीण फाऊंडेशनच्या संकेतस्थळावरील हे वचन. त्याच्या अर्थाप्रमाणे, युनूस यांनी सरकारच्या प्रमुखपदी विराजमान होण्याची कल्पना केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र, अभूतपूर्व अराजकाच्या स्थितीत देशाचे नेतृत्व करावे लागेल, अशी पुसटशी कल्पनाही त्यांनी केली असण्याची शक्यता कमीच. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर, 'हे देशाचे दुसरे स्वातंत्र्य आहे.' 'हे स्वातंत्र टिकवायला हवे, बांगलादेशने पुन्हा उभारी घ्यायला हवी', अशी मनोकामना त्यांनी व्यक्त केली आहे. ती पूर्ण होईल का, हा प्रश्न तूर्त अनुत्तरित असला तरी युनूस यांचा पूर्वेतिहास आश्वासक ठरतो.बांगलादेशच्या चितगाँगमध्ये १९४०मध्ये जन्मलेले युनूस हे त्यांच्या आईवडिलांच्या नऊ अपत्यांपैकी तिसरे. प्राथमिक शिक्षणानंतर त्यांनी ढाका विद्यापीठातून अर्थशास्त्रात बीए आणि एमए केले आणि काही वर्षे याच विद्यापीठात अध्यापनाची जबाबदारी स्वीकारली. फुलब्राईट स्कॉलरशीपद्वारे ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. तिथल्या व्हंडरबिल्ट युनिव्हर्सिटीतून त्यांनी अर्थशास्त्रात पीएच. डी. मिळवली आणि तिथेही काही काळ त्यांनी अध्यापनाचा मार्ग निवडला. त्यावेळी बांगलादेश मुक्ती संग्राम ऐन भरात होता. मायदेशाबद्दल अपार जिव्हाळा असलेल्या युनूस यांना स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. त्यांनी पाकिस्तानला होणारी लष्करी मदत रोखण्यासाठी अमेरिकी संसदेच्या नेत्यांकडे विनवणी केली. शिवाय, वॉशिंग्टनमध्ये 'बांगलादेश इन्फॉर्मेशन सेंटर' सुरू करून त्यांनी बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात अमेरिकेतून बळ दिले. बांगलादेश स्वातंत्र्यानंतर त्यांनी मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला आणि १९७२मध्ये चितगोंग विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली.स्वातंत्र्यानंतर स्थिरस्थावर होत असतानाच बांगलादेश भीषण दुष्काळात भरडला गेला. त्यात देशातील सुमारे दीड कोटी नागरिकांचा बळी गेला. गरिबांबद्दल कणव असलेल्या युनूस यांना हे दु:ख असह्य झाले. विद्यापीठाच्या वर्गात अर्थशास्त्राचे धडे देण्यापेक्षा ते दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रत्यक्षात अमलात आणण्याचा निर्णय त्यांनी घेतला. दुष्काळापीडितांचे प्रत्यक्ष नुकसान झालेले नसेल तर त्यांना बँका कर्ज देत नसल्याचे युनूस यांना आढळले. त्यामुळे सुरुवातीला त्यांनी स्वत: ४२ कुटुंबांना कर्ज दिले. त्यातून व्यवहारांना चालना मिळेल, असा त्यांचा प्रयत्न होता. 'गरीब कर्जासाठी अपात्र नाहीत. त्यांना कर्ज मिळायलाच हवे. वाजवी व्याजदाराने कर्ज दिले तर ते वेळेवर कर्जफेडही करतात', असे युनूस यांचा अनुभव. त्यातूनच पुढे ग्रामीण बँकेचा प्रयोग आकारला आला. 'माझ्या सभोवती दारिद्र्यच दारिद्र्य दिसत होते. मी त्याकडे दुर्लक्ष करू शकलो नाही. मला या पिचलेल्या लोकांसाठी काहीतरी करायचे होते म्हणून मी हे काम हाती घेतले. पण, ते धोरणकर्ता किंवा संशोधक म्हणून नव्हे', असे युनूस म्हणतात. मात्र, त्यांनी केलेले काम अस्सल धोरणकर्त्यासारखेच पथदर्शी आहे.सर्वसाधारणपणे जे कर्ज मिळवण्यास अपात्र ठरतात त्यांना छोटी-छोटी कर्जे वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवून १९८३मध्ये युनूस यांनी ग्रामीण बँकेची स्थापना केली. दुष्काळामुळे प्रत्यक्ष नुकसान झालेले असो वा नसो, गरिबांना कर्जवितरणावर बँकेने भर दिला. अल्पावधीतच बांगलादेशात ग्रामीण बँकेने पाय घट्ट रोवले. बँकेने कर्ज वितरणावेळी '१८ निर्णय' अशी अनोखी संकल्पना राबवली. त्यानुसार, कर्जदाराला काही निर्णयांचे पालन करण्याचे वचन घ्यावे लागे. उदा. आपल्या मुलांना शिक्षण देऊ, आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करू, वगैरे वचन कर्जदारांना देणे बंधनकारक होते. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. महिला सक्षमीकरणाला बळकटी मिळाली, शाळेतील पटसंख्या वाढू लागली, घरांत स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष दिले जाऊ लागले, बालमृत्यूचे प्रमाण घटू लागले. ही बँक इतकी यशस्वी झाली की अगदी भिक्षेकऱ्यांनाही कर्ज मिळत होते. बँकेने बांगलादेशच्या समाजव्यवस्थेत नवे परिवर्तन घडविले. त्यामुळेच मोहम्मद युनूस आणि ग्रामीण बँकेला सन २००६च्या नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले.आज चार दशकांनंतर या बँकेच्या कर्जदारांची संख्या एक कोटी ६० लाख आहे. त्यात महिलांची संख्या ९७ टक्के आहे. बँकेने आत्तापर्यंत ३८ अब्ज डॉलरचे कर्जवितरण केले. कर्जवसुलीचे प्रमाण ९६.३ टक्के इतके उच्च आहे. देशातील द्रारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमात या बँकेचे मोठे योगदान आहे. सध्या देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण सुमारे १८ टक्के इतके कमी आहे. या बँकेच्या यशानंतर जगभरात सुक्ष्म वित्तपुरवठा संस्था पुढे आल्या. भारतात विशेषत: पश्चिम बंगालमधील बंधन ही वित्तसंस्था त्यापैकीच एक. जगातील सुमारे १०० देशांनी ग्रामीण बँकेचे अनुकरण केले आहे. हे या बँकेचे यश असले तरी तिचे टीकाकारही कमी नाहीत. ग्रामीण बँकेच्या काही योजनांमध्ये जादा व्याजदरामुळे कर्जदार आणखी गाळात जातात, असे या टिकाकारांचे म्हणणे. त्यावर, 'पैसे कमावणे नव्हे, तर गरिबांना मदत करणे आणि छोट्या उद्योगांना अर्थबळ देणे हेच बँकेचे उद्दिष्ट आहे', असे प्रत्युत्तर युनूस देतात.देशातील जनक्षोभानंतर पदच्युत होऊन अज्ञातवासात गेलेल्या शेख हसीना आणि मोहम्मद युनूस यांच्यात याआधी अनेकदा संघर्ष झाला. 'ग्रामीण बँक ही स्वत:ची मालमत्ता असल्यासारखे युनूस यांचे वर्तन असून, ही बँक गरिबांच्या रक्ताचे शोषण करीत आहे', अशी टीका हसीना यांनी केली होती. एवढेच नव्हे, तर हसीना यांनी निवृत्तीवयाच्या नियमावर बोट ठेवून या बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकपदावरून युनूस यांना दूर केले. मात्र, त्यानंतरही देशासह जगभरात युनूस यांच्याभोवती असलेले वलय कमी झाले नाही.युनूस यांनी सन २००७मध्ये सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर 'नागरिक शक्ती पक्ष' नावाच्या राजकीय पक्षाची घोषणा केली होती. मात्र, त्यांना अपेक्षित पाठबळ मिळाले नाही. शिवाय हसीना यांनी त्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा लावला होता. 'राजकारणातील नवखे हे नेहमीच धोकादायक असतात, त्यांच्यापासून सावध राहायला हवे', अशी खोचक टिप्पणी हसीना यांनी केली होती. अखेर काही महिन्यांतच युनूस यांनी राजकीय पक्षाचा विचारच सोडून दिला. त्यानंतरही बदनामीचा खटला, करचुकवेगिरी आदींचे आरोप त्यांच्यावर झाले. कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी न्यायालयाने गेल्या जानेवारीत युनूस यांना सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षाही सुनावली. अलीकडेच युनूस यांच्यावर दूरसंचार कंपनीतील कर्मचारी कल्याण निधीतील २.२ दशलक्ष डॉलर्सच्या अपहाराचा आरोप ठेवण्यात आला. गैरव्यवहार आणि नियम उल्लंघनाचे सुमारे १५० गुन्हे युनूस यांच्यावर आहेत. मात्र, हे सर्व गुन्हे खोटे आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा युनूस यांचा दावा आहे. देशाच्या जनक्षोभाचे जनक ठरलेल्या विद्यार्थी आंदोलकांनाही त्याची कल्पना असावी. त्यामुळेच त्यांनी या महत्त्वाच्या टप्प्यावर नेतृत्वासाठी युनूस यांची निवड केली.युनूस यांनी अलीकडेच तीन शून्यांची संकल्पना मांडली होती. 'शून्य दारिद्र्य, शून्य बेरोजगारी आणि शून्य कर्बउत्सर्जन' ही ती संकल्पना. त्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित असल्याचे युनूस यांनी म्हटले आहे. बांगलादेशचा 'हंगामी प्रमुख' म्हणून युनूस यांना फार मोकळीक मिळणार नाही. मात्र, या निर्णायक वळणावर स्वकल्पनेप्रमाणे देशाला दिशा देण्याची संधी त्यांना आहे.

# आजार आणि माणूस

एका जिल्ह्याच्या ठिकाणी मनोविकारतज्ज्ञाचा व्यवसाय स्थिर करण्याच्या धडपडीच्या काळातील गोष्ट. त्याकाळी इतर शाखांचे, म्हणजे अस्थिरोग, नेत्रविकार, हृदयविकार वगैरे विषयांचे किमान शंभरावर पदव्युत्तर तज्ज्ञ असलेल्या गावात एकही मनोविकारतज्ज्ञ नव्हता. मला सहव्यावसायिक म्हणू लागले, 'तुमची काय, चांदी आहे. कुणीही स्पर्धक नाही! एकहाती सत्ता.' जणू काही मी सार्वजनिक मक्तेदारी असलेल्या विद्युतपुरवठा महामंडळाचा अधिकारी होतो.मला स्पर्धक तज्ज्ञ नसतील, पण गावोगावी पसरलेले भोंदू बुवा, बाहेरबाधा पाहणारे स्वयंघोषित महाराज, झाडपाला करणारे मांत्रिक हे सारे माझे स्पर्धक. मनोविकारांच्या शास्त्रीय ज्ञानाचे स्पर्धक. ते आजही आहेत. माझा सुरुवातीचा अनुभव असा की माझ्याकडे येणारा एकही रुग्ण 'जाणकार मांत्रिकाकडे' जावून आलेला नसेल असे झाले नाही. बाहेरची बाधा असेल या समजुतीच्या आहारी जाऊन तब्बल एकेक वर्ष मानसिक उपचारापासून वंचित असंख्य रुग्ण. हे भोंदू बाबांनी केलेले बाहेरचे उपचार तरी कसे? कडूलिंबाच्या फांदीने झोडपणे, उपाशी ठेवणे, डोळ्यात रीठ्याचा रस पिळणे. मूळ मनोविकार बाजूला राहून डोळ्याचा दाह आणि जंतुसंसर्गाचा उपचार हा आणीबाणीचा होऊन बसायचा. अंगारेधुपारे परवडले, कमीतकमी ते निरुपद्रवी तरी असतात.शहरातील सुशिक्षित लोकांच्या मनात मनोविकारांविषयी उदंड गैरसमजुती आहेत. शहर म्हणजे काय? पुलंच्या शब्दात, धोब्याच्या धुलाईने आणि शिंप्याच्या शिलाईने पुढारलेली ही खेडी. मनोविकारांविषयी धारणा सारख्याच. एक उच्चविद्याविभूषित स्त्री सांगत होती, 'मागल्या महिन्यात मी टोरोंटोला गेले होते, तिथे एका कॅनेडियन बाईकडे आठ दिवस मुक्काम होता. ती विमानतळावर सोडायला आली आणि म्हणाली, सॉरी मला लगेच परत जायला हवं कारण माझी सायकियाट्रिस्टकडे अपॉइंटमेंट आहे! मी दचकलेच. मनात विचार केला, गेली आठ दिवस मी एका वेड्या बाईच्या संगतीत होते, बापरे!' आता बोला. मानसिक आजारांकडे सहजपणे पाहण्याचा हा निकोप दृष्टीकोन आपल्या समाजात रुजायला किती वर्षं लागतील कुणास ठाऊक.मानसिक विकारांचा स्वीकार सोडा, त्यांना मनाच्या 'कमजोरीचे' लक्षण समजले जाते. कधी व्यक्तीचे न्यून. मनाचा दुबळेपणा. 'डिप्रेशन यायला काय झालं? पुरुषासारखा पुरुष तू, असे हातपाय गळून काय बसलास? अशी कोणती आपत्ती येऊन कोसळली?' आणि स्त्री असेल तर,



'काय कमी आहे तुला? सोन्यासारखा संसार आहे, राहायला घर आहे, खाण्यापिण्याची कमतरता नाही, कशाचं आलं डिप्रेशन? सगळी भरल्या पोटाची थेरं! उन्हापावसात शेतावर राबणाऱ्या बाया पाहा, काही होत नाही त्यांना,' हा वर टोमणा. पोटाच्या दुबळेपणासाठी पोटाचा डॉक्टर, हृदयाच्या दुबळेपणासाठी हृदयरोगतज्ज्ञ, तर मनाच्या दुबळेपणासाठी मनाचा डॉक्टर का नको?डिप्रेशन हा बऱ्याच अंशी मेंदू-रसायनांच्या कमतरतेमुळे होत असतो हे शास्त्रीय सत्य. त्यासाठी भोवतालचे घटक जितके महत्त्वाचे त्याहून महत्त्वाची भूमिका चेतारसायनांची, मात्र याची जाणीव भल्याभल्यांना नसते. आजही नाही. ही गोष्ट इथलीच नाही, प्रगत देशांतही मनोविकार माणसाच्या कमकुवत वृत्तीमुळे होतात, भोवताली घडणाऱ्या घटनांमुळे होतात हाच सर्वसाधारण समज आहे. त्यामुळे हा शारीरिक आजारांइतकाच शारीर आहे, याबद्दल अज्ञान आहे. या अज्ञानाची पुढची पायरी म्हणजे लोकांचा गोळ्या खाण्यावर, खाणाऱ्यावर आक्षेप. मानसिक आजारांवर दिल्या जाणाऱ्या यच्चयावत गोळ्या या 'झोपेच्या' असतात हा एक मोठा गैरसमज. गोळ्यांमुळे विचार कसे बदलतील? भावना कशा बदलतील, हा प्रश्न अनेकांना पडण्याचे कारण, मनात विचार आणि भावना उत्पन्न होणे हा चेतारसायनांचा खेळ आहे हे लोकांना कळत नाही. घरचे लोक गोळ्यांचा 'अनावश्यक' खर्च करायला तयार नाहीत म्हणून नाईलाजाने उपचार बंद करणारे तरुण मी पाहिले आहेत. ही परिस्थिती काही अंशी बदलली आहे, तरी ज्या निष्ठेने एखादा माणूस मधुमेहाच्या किंवा उच्चरक्तदाबाच्या गोळ्या जन्मभर अनुक्रमे साखरेचे किंवा मिठाचे पथ्य पाळीत घेतो त्या निष्ठेने मनोविकारांच्या गोळ्या घेत नाही.या गोळ्यांची सवय लागते हा अजून एक अवैज्ञानिक आक्षेप. सवय आणि गरज यात फरक असतो हे लोकांना कळत नाही. शरीराला अन्नाची गरज असते म्हणून माणूस रोज जेवतो, पाण्याची गरज असते म्हणून पाणी पितो. आता ते जन्मभर करावे लागते म्हणून त्याला कुणी 'जेवण्याची सवय लागली हो' असे म्हणेल का? गरज नसलेल्या किंवा अपायकारक गोष्टींचे सेवन म्हणजे (वाईट) सवय.मानसशास्त्र हे (इतर शाखांच्या) तुलनेनं नवखं शास्त्र, त्यामुळे त्यावरचे उपचार परिपूर्ण नाहीत. मेंदू-मनाचं कार्य गुंतागुंतीचं, त्यामुळे संशोधन चाचपडत पुढे जातं आहे. त्यात एमबीबीएसच्या विद्यार्थ्याला मानसशास्त्र हा विषय नावापुरता. त्याचा परिणाम असा की डॉक्टरीच्या इतर शाखांनाही त्याची अगदी जुजबी माहिती, त्यामुळे मनोविकारांबद्दल सार्वत्रिक गैरसमज. 'तुमच्या शाखेत काही तपासण्याच नाहीत.

नुसतं ऐकणं आणि बोलणं. रक्ताच्या चाचण्या, सोनोग्राफी, एमआरआय इत्यादींमध्ये शरीराचा पीडित भाग दिसतो, त्याचं आपण निदान करू शकतो, उपचार करू शकतो. जे मुळात दिसतच नाही त्यावर हे मनोविकारतज्ज्ञ कसा उपचार करू धजतात त्यांचं तेच जाणोत!' असं एका तज्ज्ञानेच मत मांडलं. मनोविकारांत माहिती घेणं, हीच महत्त्वाची तपासणी. तशा पूरक चाचण्या आहेत, मेंदू-विद्युत आलेख आहे, पण 'मन दिसेल' असा एक्सरे काढता येत नाही. त्यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा, जो इतर शाखांनाही लागू पडतो तो तज्ज्ञाच्या 'क्लिनिकल अक्युमेन'चा. तपासण्या या तज्ज्ञाच्या निदानासाठी पूरक आहेत, त्या ज्ञान आणि अनुभवाच्या परिपक्वतेची जागा घेऊ शकत नाहीत.औषधीशास्त्राच्या पुस्तकातलं पहिलं वाक्य आहे, 'मेडिसिन इज ए सायन्स अँड आर्ट ऑफ ट्रीटिंग इल पीपल.' प्रत्येक कलेचं एक शास्त्र असतं आणि प्रत्येक शास्त्रात एक कला दडलेली असते. वैद्यकशास्त्र (त्यात मानसरोगशास्त्र आलं) तेवढीच कला आहे, जेवढं शास्त्र. सगळ्या महागड्या चाचण्यांपेक्षा अनुभवानं येणारं क्लिनिकल अक्युमेन म्हणजे ठोकताळा महत्त्वाचा. 'मेडिसिन इज एन आर्ट ऑफ द प्रोबेबल.' रुग्णाच्या प्रकृतीचं काय बिनसलं असू शकतं हे अनुभवाधारित अनुमान सत्याच्या जितक्या जवळ नेऊ शकतो तो यशस्वी डॉक्टर.विद्यार्थी जीवनातली माझ्या गुरूंची एक शिकवण आजही लक्षात आहे. एका रुग्णाला मी तपासत होतो. त्याला कधी फिट आल्याचं आठवत नव्हतं, मात्र त्याच्या मेंदू-आलेखात अपस्माराच्या (फिट) खुणा दिसत होत्या. 'त्यावरच्या गोळ्या लिहू का?' या माझ्या प्रश्नावर सर शांतपणे म्हणाले, 'तुला मेंदू-आलेखाचा इलाज करायचा आहे की रुग्णाचा?'आज मला गुरूंच्या जागी हिपोक्रेटस दिसू लागतो. आधुनिक वैद्यकशास्त्राचा आद्य ग्रीक गुरू. तो म्हणतो, 'एखाद्या माणसाला झालेला आजार समजण्यापेक्षा आजार झालेला माणूस समजून घेणं मला जास्त महत्त्वाचं वाटतं.' इसवी सनापूर्वी पाचव्या शतकात होऊन गेलेल्या या महानुभावाची शिकवण मनात झिरपायला पाव शतकाचा कालावधी लागला, हा फायद्याचा सौदा!

# औषधांनी रोखा प्री डायबेटिक अवस्था

आपला देश जागतिक पातळीवर मधुमेहाची राजधानी म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. 'इंडिया डायबिटिस' हा वीस वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या प्रौढ भारतीयांवर केलेल्या संशोधनाचा अहवाल 'आयसीएमआर'ने गेल्या वर्षी प्रकाशित केला. या अभ्यासानुसार, भारतात १० कोटी, म्हणजे लोकसंख्येच्या ११.४ टक्के मधुमेही आहेत आणि १३.६ कोटी, म्हणजे लोकसंख्येच्या १५.३ टक्के प्री डायबेटिक किंवा मधुमेहपूर्व स्थितीत आहेत. साहजिकच, मधुमेह होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींना या दुर्धर विकारापासून कसे दूर राहता येईल, याबाबत व्यक्तिगत आणि सरकारी पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

मधुमेह अजिबात नसणे आणि 'टाइप-२' मधुमेह असणे, यांच्या दरम्यानच्या अवस्थेला मधुमेहपूर्व अवस्था म्हणतात. या अवस्थेचे निदान करण्यासाठी 'ग्लुकोज टॉलरन्स टेस्ट' केली जाते. यामध्ये व्यक्तीची उपाशीपोटीची रक्तशर्करा मोजून, त्याला ७५ ग्रॅम ग्लुकोज ग्लासभर पाण्यातून दिले जाते. त्यानंतर दर अर्ध्या तासाने त्याच्या रक्तशर्करेचे मोजमाप केले जाते. यात मधुमेह नसलेल्या व्यक्तीची शर्करापातळी उपाशीपोटी ८० ते १०० मिलिग्रॅम असते. प्री डायबेटिक व्यक्तीचे हे मोजमाप १२० ते १४५ मिलिग्रॅमच्या दरम्यान असते. ग्लुकोज दिल्यानंतर दर अर्ध्या तासाने केलेल्या मोजणीमध्ये त्याची पातळी १४०-१९५च्या दरम्यान राहत असल्यास त्या व्यक्तीला मधुमेहपूर्व अवस्था आहे, असे मानले जाते. अशा व्यक्तींची 'एचबीए१सी' या चाचणीची पातळी ५.७ ते ६.४ टक्क्यांच्या दरम्यान असल्यास, प्री डायबेटिक अवस्थेच्या निदानाची खात्री होते.

सर्वसाधारणपणे प्री डायबेटिक व्यक्तींपैकी जवळजवळ ५० टक्के पुढील काळात मधुमेही बनतात. काही प्रयत्न करून प्री डायबेटिक अवस्था लांबवता आली, तर मधुमेह खूप उशिरा होतो आणि त्यात गुंतागुंत उद्भवत नाही.

**प्री डायबेटिक व्यक्ती आणि मधुमेह प्रतिबंध**

मधुमेह असलेल्या व्यक्तींना हृदयविकार होण्याची आणि स्ट्रोक येण्याची शक्यता मधुमेह नसणाऱ्या व्यक्तींपेक्षा दोन ते चार अधिक असते. मधुमेहाबाबत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा एक 'मूक आजार' असतो.


(चित्र : एआय)

सुरुवातीला याची कोणतीही लक्षणे जाणवत नाहीत. रक्ताच्या तपासणीतूनच त्याचे निदान होते. चाळिशीनंतर प्रत्येक व्यक्तीने दर वर्षी रक्तातील साखर आणि 'एचबीए१सी' या चाचण्या करायला हव्यात.

मधुमेह टाळण्यासाठी असलेल्या उपायांमध्ये, जीवनशैलीत परिणामकारक बदल करून, वजन नियंत्रित राखणे गरजेचे असते. त्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) २० ते २४च्या दरम्यान राखावा लागतो. यासाठी रोज किमान २५ मिनिटे मध्यम प्रतीचा शारीरिक व्यायाम नियमितपणे करणे आणि शर्करायुक्त; तसेच तैलयुक्त स्निग्ध पदार्थ कमी करून, रोजचा आहार १४०० ते १५०० कॅलरींपर्यंत मर्यादित ठेवणे आवश्यक असते. 'चंडीगड अर्बन डायबिटिस स्टडी ग्रुप' यांनी केलेल्या दीर्घकालीन आणि व्यापक संशोधनानुसार, भारतातील व्यक्तींनी वजन योग्य पातळीत राखण्याची काळजी न घेतल्यास, रक्तातील शर्करापातळी सामान्य असूनही, १० वर्षांच्या कालावधीत, १३.६ टक्के लोकांना लोकांना मधुमेह होतो, तर १९.६ टक्के व्यक्ती प्री डायबेटिक बनतात. प्री डायबिटिसची सुरुवात असलेल्यांपैकी ५५.७ टक्के व्यक्ती मधुमेहामध्ये रूपांतरित होतात. प्री डायबिटिसचा धोका वाढवणाऱ्या घटकांमध्ये - ४५ वर्षांपेक्षा अधिक वय, बीएमआय २५ पेक्षा जास्त, बैठ्या जीवनशैलीमुळे शारीरिक निष्क्रियता, मधुमेहाचा कौटुंबिक इतिहास, पोटाचा वाढता घेर, उच्च रक्तदाब, गर्भावस्थेमध्ये मधुमेह होण्याचा इतिहास, कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसेरॉइड्सची पातळी वाढलेली असणे, यांचा समावेश होतो.

'दा क्विंग प्रिव्हेन्शन स्टडी'नुसार जीवनशैलीतील बदलांमुळे, प्री डायबिटिक व्यक्तीने दोन किलो वजन कमी केल्यास, दृष्टिदोष असलेल्या लोकांमध्ये रेटिनोपॅथीमध्ये ४० टक्के घट होऊ शकते. नेफ्रोपॅथी, न्यूरोपॅथी आणि सूक्ष्म रक्तवाहिन्यासंबंधी गुंतागुंत होण्याचे प्रमाण २८ टक्क्यांनी कमी होते.

**औषधांनी मधुमेह रोखणे**

जीवनशैलीमध्ये बदल घडवून, त्याचे सातत्याने पालन करणे, हे दैनंदिन जीवनात एक आव्हानच असते. त्यासाठी उच्च पातळीचे मनोबल लागते. साधारणपणे ७० टक्क्यांपेक्षा जास्त व्यक्तींना ते जमत नसल्यामुळे, औषधे वापरण्यावाचून पर्याय नसतो. 'टाइप-२' मधुमेह रोखण्यासाठी किंवा तो पूर्णपणे उद्भवण्यात विलंब करण्यासाठी मेटफॉर्मिन, अल्फा-ग्लुकोसाइडेज इनहिबिटर, इंक्रेटिन रिसेप्टर ॲगनिस्ट (उदा. लिराग्लुटाइड आणि सेमॅग्लुटाइड), थायाझोलिडिनडायोन्स अशी औषधे वापरता येऊ शकतात. यापैकी मेटफॉर्मिन हे बऱ्यापैकी सुरक्षित आणि अत्यंत कमी खर्चात मिळणारे आहे. मधुमेह रोखण्यासाठी, बीएमआय आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी या औषधाची उपयुक्तता, अनेक क्लिनिकल चाचण्यांमध्ये, विशेषत: तरुण आणि जास्त वजन असलेल्या रुग्णांमध्ये सिद्ध झाली आहे. इंडियन डायबिटिस प्रिव्हेन्शन प्रोग्रॅममध्ये, ग्लुकोज टॉलरन्स चाचणीत दोष आढळलेल्या भारतीय व्यक्तींमधील 'टाइप-२' मधुमेहाची शक्यता कमी करण्यासाठी, जीवनशैलीतील बदलासोबत मेटफॉर्मिन वापरल्यास फायदेशीर परिणाम होतात, असे सिद्ध झाले आहे. या संस्थेच्या संशोधनानुसार, केवळ जीवनशैलीतील बदल केल्यास मधुमेह होण्याची जोखीम २६.५ टक्क्यांनी कमी होते, केवळ मेटफॉर्मिन वापरल्यास ती २६.४ टक्क्यांनी कमी होते; पण जीवनशैलीतील बदल आणि मेटफॉर्मिन एकत्रित केल्यास मधुमेह होण्याची जोखीम २८.२ टक्क्यांनी कमी होते.मधुमेहाच्या उपचारामध्ये 'अमेरिकन डायबिटिस असोसिएशन'तर्फे दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे जगभरात पालन केले जाते. या संस्थेने जाहीर केल्यानुसार, 'टाइप-२' मधुमेहाची उच्च जोखीम असलेल्या २५ ते ५९ वयाच्या प्रौढांमध्ये, बीएमआय ३५पेक्षा जास्त असेल, उपाशी पोटीची शर्करा ११० मिलिग्रॅमपेक्षा अधिक असेल, 'एचबीए१सी' सहा टक्क्यांपेक्षा अधिक असेल आणि स्त्रियांना गरोदर अवस्थेतल्या 'जेस्टेशनल डायबिटिसचा इतिहास असेल, तर त्यांना मेटफॉर्मिन द्यावे.मधुमेही रुग्णांची वाढती संख्या, हे भारताच्या आरोग्यव्यवस्थेवरचे एक ओझेच आहे. या वाढत्या संख्येचे नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक अशा दोन्ही उपायांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. प्री डायबिटिसची 'टाइप-२' मधुमेहापर्यंत होणारी प्रगती रोखण्यासाठी मेटफॉर्मिनची उपयुक्तता दर्शविणारे पुरावे आहेत. जीवनशैलीतील बदलांव्यतिरिक्त, मेटफॉर्मिन थेरपीचा विचार मधुमेहपूर्व अवस्थेतील रुग्णांसाठी करण्याची अधिकृत मान्यता मेटफॉर्मिनला मिळणे आवश्यक आहे.

# अंतराळवीर कधी परतणार?

अमेरिकी अवकाश संशोधन संस्था - नासाचे अंतराळवीर बॅरी विल्मोर आणि सुनीता विल्यम्स हे गेले दोन महिने आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर (आयएसएस) मुक्कामी आहेत. बोईंग कंपनीच्या 'स्टारलायनर' या अवकाश यानाच्या चाचणीसाठी आठ दिवसांच्या नियोजनाने अवकाशात गेलेल्या दोघा अंतराळवीरांचा अवकाशातील मुक्काम यानातील तांत्रिक बिघाडामुळे वाढत चालला आहे. एकीकडे माध्यमांमधून नासा आणि बोईंग कंपनीवर याबाबत टीका होत असताना, अंतराळवीरांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचा निर्वाळा दोन्ही संस्थांकडून देण्यात येत आहे.नासाने सन १९६०च्या दशकात आपला मानवी अवकाश कार्यक्रम सुरू केला. प्रशिक्षित अंतराळवीरांना पृथ्वी नजीकच्या कक्षेत नेऊन पुन्हा जमिनीवर सुरक्षित आणण्यासाठी नासातर्फे मर्क्युरी, जेमिनी, अपोलो, स्पेस शटल हे कार्यक्रम राबवण्यात आले. एका महाकाय रॉकेटच्या साह्याने अवकाश यानाचे प्रक्षेपण करायचे. त्यानंतर पृथ्वीभोवतीच्या कक्षेत आपले निर्धारित काम पूर्ण करून अवकाश यान पुन्हा अलगद समुद्रावर उतरवायचे, असे सुरुवातीच्या मोहिमांचे स्वरूप होते. त्यानंतर स्पेस शटल या विमानसदृश, पुनर्वापर करता येणाऱ्या यानाचा नासाने तीन दशके वापर केला. विविध सहा स्पेस शटलच्या साह्याने अवकाश स्थानकाची उभारणी, हबल स्पेस टेलिस्कोप; तसेच अनेक उपग्रहांच्या प्रक्षेपणाचे कामही करण्यात आले. त्यांपैकीच कोलंबिया या स्पेस शटलच्या अपघातामध्ये भारतीय वंशाच्या अंतराळवीर कल्पना चावला यांचा मृत्यू झाला होता.स्पेस शटल कार्यक्रम सन २०११मध्ये थांबवल्यानंतर नासाला आपल्या अंतराळवीरांची अवकाशात ने-आण करण्यासाठी नव्या अवकाश यानांची गरज होती. अमेरिकेच्या बदललेल्या अवकाश धोरणानुसार मानवी अवकाश कार्यक्रमासाठी आवश्यक यानांची किंवा रॉकेटची बांधणी करणे, अंतराळवीरांच्या अवकाश प्रवासाचे नियोजन करणे या बाबी नासाच्या प्राथमिक उद्दिष्टांमधून वगळून नासाने संशोधनाच्या अवकाश मोहिमांवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले. मानवी अवकाश यान आणि त्यासाठी लागणारी रॉकेट अमेरिकी उद्योगांकडून बनवून घेऊन अंतराळवीरांच्या प्रवासाचे कंत्राटही खासगी कंपन्यांना देण्याचे निश्चित झाले. त्यासाठी कंपन्यांना आवश्यक असणारे तांत्रिक आणि सुमारे आठ अब्ज अमेरिकी डॉलरचे प्राथमिक अर्थ साहाय्य नासाने देऊ केले.

# विद्यार्थ्यांनी शिवचरित्र अभ्यासणे काळाची गरज–ज्ञानदेव काशीद

## गोरे इंग्लिश स्कूल चौसाळा मधील शिवजयंतीचा कार्यक्रम नाविन्यपूर्ण

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथील गोरे इंग्लिश स्कूल शाळेत हिंदवी स्वराज्य संस्थापक जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त इतिहास अभ्यासक समाज प्रबोधनकार शब्दांचा सह्याद्री आवाजांचा बादशहा श्री ज्ञानदेव काशीद यांचा शिवव्याख्यान पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी सर्वप्रथम उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती पूजन दीप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन संपन्न झाले यानंतर कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचा शाळेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यानंतर शाळेच्या प्राचार्य अंजली गोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते ज्ञानदेव काशीद यांनी आपल्या पहाडी आवाजात पहिली ते दहावी च्या विद्यार्थ्यांना अवगत होईल अशा पद्धतीने शिवविचार मांडले यावेळी बोलताना ज्ञानदेव काशीद म्हणाले की ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी एक एक गड किल्ला जिंकून स्वराज्य निर्माण केले त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांनी प्रचंड अभ्यास करून शैक्षणिक क्षेत्रातील वैद्यकीय अभियांत्रिक प्रशासकीय किल्ले काबीज केले पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादित केले त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मापासून ते राज्याभिषेक पर्यंतचा सर्व इतिहास विद्यार्थ्यांसमोर अतिशय सोप्या भाषेत ज्ञानदेव काशीद यांनी मांडला यावेळी सर्व विद्यार्थी छत्रपती शिवरायांचा प्रत्येक प्रसंग अतिशय कुतूहलतेने ऐकत होते व्याख्यानातून ज्ञानदेव काशीद यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे शेतीविषयक धोरण पाणी आडवा पाणी जिरवा झाडे लावा झाडे जगवा व स्त्री विषयक धोरण आधी विषय विद्यार्थ्यांसमोर मांडले आणि शेवटी सर्व




विद्यार्थ्यांनी शिवचरित्र अभ्यासून शिव विचार आचरणात आणले पाहिजे असे प्रतिपादित केले यानंतर दुपार सत्रात शिवजयंती निमित्त शालेय विद्यार्थ्यांनी विविध शिवगीतावर नृत्याविष्कार सादर करून उपस्थित सर्व मान्यवरांची मने जिंकली यावेळी विद्यार्थ्यांनी झुलवा पाळणा, आम्ही शिवकन्या, असते कदम आदी शिव गीतावर नृत्य सादर करून सर्व शालेय परिसर शिवमय करून टाकला यानंतर विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरती भाषणे सादर केली यावेळी पहिली इत्तेत शिकणाऱ्या श्री दत्त पंडित जोगदंड याने शिवाजी महाराज यांच्या वेशभूषा मध्ये येऊन आपल्या गोड वाणीने शिवाजी महाराज यांच्या विषयीचे मनोगत व्यक्त करून उपस्थित मान्यवरांची मने जिंकली व इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कुमारी तनवी विष्णू नाईकवाडे हिने आपल्या पहाडी आवाजात शिव विचार मांडून उपस्थित मान्यवरांची वाहवा मिळवली यावेळी कार्यक्रम प्रसंगी माजी मुख्याध्यापक श्री रसाळ सर, रौवळसगावचे सरपंच वैभव मोरे, कानडी घाट चे सरपंच गोकुळ कुडके,मा.श्री. रामहरी जोगदंड, सौ मंगल जोगदंड, पत्रकार पंडित जोगदंड, पत्रकार विकास नाईकवाडे, आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती शेवटी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले .

# अश्वत्थलिंग देवस्थान हा जिल्ह्याचा ठेवा आहे–माजी मंत्री क्षीरसागर

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पिंपळवंडी हे स्कंदपुराणात नोंद असलेले गाव आहे.या ठिकाणी असलेले अश्वत्थलिंग शिवलिंग शंभरावे शिवलिंग म्हणून ओळखले जाते.हा बीड जिल्ह्याचा ठेवा असून याचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे. महाशिवरात्रीनिमित्त श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर देवस्थान पिंपळवंडी या ठिकाणी महाशिवरात्री प्रित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह व रामचरितमानस कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी या ठिकाणी भेट देऊन



शिवलिंगाचे दर्शन घेतले.यावेळी मठाधिपती महादेवानंद भारती महाराज यांनी संस्थानच्या वतीने भव्य स्वागत केले.यावेळी विलास बडगे,दिनकर कदम,सुभाष क्षीरसागर,अरुण डाके,सखाराम मस्के, नवनाथ कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# पिंपळवंडी येथील महामार्गालगत अतिक्रमण काढण्यात व्यवसायीकांनी केली सुरुवात

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

रहदारीस अडथळा ठरत असलेल्या बीड–अहिल्यानगर या महामार्गावरील हातोला ते लिंबादेवी फाटा दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दोन्ही साईडचे रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूचे दहा मीटर अंतरावरील जे काही अतिक्रमणे झाली असून ती अतिक्रमणे हटविण्याची मोहीम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने राबविली जात आहे.या मार्गावरील रस्त्याजवळील अतिक्रमणे संबंधितानी त्यांनी स्वतःहून दोन दिवसात काढावीत असे आवाहन संबंधित विभागाकडून करण्यात आलेले आहे.त्याची दखल घेऊन



शासनाच्या अतिक्रमणाचा हातोडा पडण्याअगोदरच पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी- अंमळनेर व अन्य गावातील व्यावसायिक व व्यापारी रस्त्यावरील आलेले अतिक्रमण स्वतःहून काढीत आसल्याचे या मार्गावर सर्वत्र चित्र पहावयास मिळत आहे.

# स्वारगेट प्रकरणातील आरोपीची खैर नाही नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे

## अशी सरकारची भूमिका–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे


**मुंबई (वृत्तसंस्था)**–पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. लाडक्या बहिणीवर अत्याचार करण्याची गय केली जाणार नाही. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे. त्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्याचे सरकारचे धोरण असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

पुण्याच्या स्वारगेट बसस्थानक परिसरात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये मंगळवारी पहाटे ५.३० च्या सुमारास एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाला होता. या घटनेमुळे एकच खळबळ माजली होती. अत्याचार करून फरार झालेला आरोपी स्थानकातील सीसीटीव्हीत कैद झाला. दत्तात्रय रामदास गाडे असे त्याचे नाव असून त्याच्या शोधासाठी पोलिसांची १३ पथके रवाना झाली असून तपास केला जात आहे.पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. आमच्या लाडक्यासोबत निंदनीय प्रकार घडलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मी स्वत: या प्रकरणात लक्ष घालून आहे. मी स्वत: पुणे पोलिसा आयुक्तांशी चर्चा केली आहे. याप्रकरणी कठोर कारवाई करण्याच्या सूचना आम्ही सरकारच्या वतीने दिलेल्या आहेत. आरोपीचे सर्व लागेबांधे पोलिसांच्या हाती आलेले



आहेत. त्याला कुठल्याही परिस्थिती तत्काळ अटक केली होईल.अशाप्रकारचे नराधम आमच्या लाडक्या बहिणींवर अत्याचार करत असतील, तर त्यांची गय केली जाणार नाही, सोडले जाणार नाही. अशा नराधमांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्याचे सरकारचे धोरण आणि भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असू द्या, त्याचा कोणाशीही संबंध असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. हा गुन्हेगार आहे. लाडक्या बहिणीवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगाराला सोडले जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. ज्या बस आगारात बंद पडलेल्या बसमध्ये होणारे गैरप्रकार पूर्णपणे बंद झाले पाहिजेत. अशा प्रकारच्या बंद पडलेल्या गाड्या तत्काळ निकाली काढाव्यात. कुठल्याही परिस्थितीत गुन्हेगारीला वाव मिळता कामा नये, अशा सूचना सर्व आगार प्रमुखांना दिल्या आहेत. परिवहन मंत्र्यांनी काल सुरक्षा रक्षकांवर निलंबनाची कारवाई केलेली आहे. या प्रकरणात कुणालाही पाठिशी घातले जाणार नाही. एसटी महामंडळ प्रशासन आणि सरकारच्या वतीने कठोर कारवाई केली जाईल. लाडक्या बहिणी सुरक्षित राहिल्या पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे.

# बोरफडी हिवरापाहाडी डोगरपटयात बिबट्याने केली शेळीची शिकार



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बोरफडी हिवरापाहाडी डोगरपटयात गुरूवारी दूपारी जंगलात शेळी चारण्यासाठी लावल्या असता बिबट्याने एका शेळीवर हाला करून शेळीओढत नेमताना समधित शेतकरयाने पाहुन आरडाओरडा केला त्यामुळे बिबट्या पळून गेला सदर घटनेची माहिती वनविभागाला दिली असता वन परिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वन पाल आंगद बहिरवाळ वनसंरक्षक महानंदा डोळस यांनी घटनेची पाहणी करून पंचनामा केला जरूड येथिल पशुधन अधिकारी यांनी पोस्ट मारटम केले समाधीत शेतकरी बताश बांबु सुळ रा हिवरापाहाडी यांना आर्थिक मदत करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते हारीदास ठोंबरे यांनी वन विभागाकडे केली आहे या घटनेमुळे या परीसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे या संदर्भात वनविभासी संपर्क साधला असता वनपाल अंगद बहिरवाळ यांनी सांगितले की या परिसरातील जंगलात बिबट्याचा वावर आसु शकतो पण हि शिकार बिबट्याने केली कि लांडग्यांनी हे पि यम रिपोर्ट वरूनच कळेल मात्र या परिसरातील शेतकर्यांनी सावध राहावे असे सांगितले

# नाशिकचा पालकमंत्री भाजपचाच सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे वरिष्ठांचा निर्णय

## रायगडचा पालकमंत्री कोण? अद्यापही पेच कायम

**मुंबई (वृत्तसंस्था)**–सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भारतीय जनता पक्षाकडेच राहणार असून रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्याप सुटलेला नसल्याची माहिती भारतीय जनता पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने दिली आहे. त्यामुळे आता नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पुन्हा एकदा गिरीश महाजन यांच्याकडेच देण्यात आले असून रायगडचा तिढा मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एकत्र बसून सोडवण्याचा सल्ला देखील दिल्लीतून देण्यात आला आहे.

राज्यात सत्ता स्थापन झाल्यानंतर देखील अद्याप दोन जिल्ह्याचे पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नाही. या दोन जागेवरून महायुतीमध्ये वाद असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे नाशिक आणि रायगड जिल्ह्याला अजूनही पालकमंत्री मिळालेला नाही. १८ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री पदांच्या नावांची



घोषणा केली होती. मात्र त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाला स्थगिती द्यावी लागली होती. या दोन्ही जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते नाराज असल्याची माहिती समोर आली आहे.नाशिक जिल्ह्यात आगामी काळात होणारा सिंहस्थ कुंभमेळा पाहता नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भारतीय जनता पक्षाकडेच राहणार असल्याची माहिती दिल्लीतील सूत्रांनी दिली आहे. कुंभमेळा मंत्री म्हणून या आधीच गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या कुंभमेळ्याचे भव्य नियोजन करण्याचा निर्णय भारतीय जनता पक्षाने घेतला आहे. त्यासाठी गिरीश महाजन यांच्याकडेच पालकमंत्री पद राहणार असल्याची माहिती मिळाली आहे. आगामी एक ते दोन दिवसातच याबाबत अधिकृत घोषणा होऊ शकते.नाशिक जिल्ह्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे पालकमंत्री पद हे भाजपकडे राहणार असले तरी रायगडच्या पालकमंत्री पदाबाबतचा तिढा अजूनही कायम आहे. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी बसून एकत्र निर्णय घ्यावा, असे निर्देश दिल्लीतील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दिले आहेत. रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भरत गोगावले यांच्या कडे देण्याची एकनाथ शिंदे यांची इच्छा आहे. तर अजित पवार यांना आदिती तटकरे यांच्याकडे पालकमंत्री पद द्यायचे आहे. त्यामुळे आता याबाबत एकनाथ शिंदे आणि अजित पवार काय निर्णय घेतात? हे पहावे लागेल.

## मंत्री शिरसाटांची सिडको बसस्थानकाला अचानक भेट

# कामकाजाचा घेतला आढावा पाहणीनंतर कर्मचाऱ्यांना सुनावले

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बसस्थानकानंतर महत्त्वाचे असलेल्या सिडको बसस्थानकाला जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी बसस्थानक परिसरातील परिस्थितीची पाहणी करून आढावा घेतला. या पाहणीदरम्यान संजय शिरसाट चांगलेच संतापल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी सिडको बसस्थानक कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. पुणे शहरातील वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बसस्थानक परिसरात २६ वर्षीय तरुणीवर शिवशाही बसमध्ये बलात्कार केल्याची घटना घडली होती. विशेष म्हणजे सुरक्षा रक्षकाच्या कॅबिनजवळ ही घटना घडल्याने एकच खळबळ उडाली होती. या घटनेनंतर पुण्यामध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी शहरातील सिडको बसस्थानकाला गुरुवारी



सकाळी अचानक भेट देऊन पाहणी केली.संजय शिरसाट यांनी सिडको बसस्थानकात अचानक भेट दिल्याने एसटी कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाल्याचे दिसून आले. पुण्यातील घटनेनंतर सिडको बसस्थानकातील कामकाजाचा तसेच सुरक्षेचा आढावा घेतला. यावेळी बसस्थानक परिसरातील असलेल्या अस्वच्छतेवरून देखील संजय शिरसाट यांनी कर्मचाऱ्यांना सुनावले. बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही तरी सुरू आहेत का? असा प्रश्न संजय शिरसाट यांनी उपस्थित केला आहे. याबाबत पोलिस आयुक्तांशी बोलणार असल्याचे ते म्हणाले. दुसरीकडे, पुणे स्टेशन एसटी बस स्थानकाची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून पाहणी करण्यात आली. ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे आणि पदाधिकाऱ्यांनी आगार कर्मचाऱ्यांशी चर्चा करून बसस्थानकातील सुविधांचा आढावा घेतला. यावेळी ठाकरे गटाकडून विविध मागण्यांचे निवेदन आगारप्रमुखांना देण्यात आले.दरम्यान, स्वारगेट बस डेपो परिसरात एसटी बस मध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणानंतर आता महाराष्ट्र शासनाचा परिवहन विभाग हाय अलर्ट वर आला आहे. या संदर्भात आज झालेल्या बैठकीत सर्व एसटी डेपोंमध्ये सीसीटीव्हीचे जाळे बसवण्याच्या सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केल्या आहेत.

# पारमार्थिक जीवनात भक्ती,ज्ञान वैराग्याची अत्यंत गरज-ह.भ.प.श्रीहरि पूरी महाराज

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

पारमार्थिक जीवनात उन्नती करायची असेल तर जीवनात भक्ती,ज्ञान आणि वैराग्याची गरज आहे.भक्ती,ज्ञान, वैराग्याची व्याख्या सांगताना तुकाराम महाराजांनी स्पष्ट शब्दात सुत्रात्मक भक्ती म्हणजे नमन,वैराग्य म्हणजे त्याग आणि ज्ञान म्हणजे ब्रम्हीभोग याची परिणीती ब्रम्हतनू झाली पाहिजे.पारमार्थिक क्षेत्रात वाटचाल करताना एकतर वेदाच्या मागे गेले पाहिजे अथवा संताच्या मागे गेले पाहिजे तरच परमात्म स्वरुपाची प्राप्ती करून घेता येते.मनाच्या मागे जाण्यात मानवाची अधोगती आहे.खरी भक्ति कशाला म्हणतात.पारमार्थिक जीवनात भक्ती,ज्ञान,वैराग्याची अत्यंत गरज असल्याचे प्रतिपादन ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज यांनी केले.आष्टी येथील बेलेश्वर मंदीर आवारात महाशिवरात्रीनिमित्त सुरु असलेल्या सप्ताहात कीर्तन प्रसंगी बोलत होते. यावेळी भक्ती ते नमन वैराग्य तो त्याग,ज्ञान ब्रम्ही भोग ब्रम्हतनु

या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर विवेचन केले.यावेळी दिनकरराव तांदळे महाराज,संपतराव धोंडे,सुभष रासकर,प्रदीप सहस्त्रबुद्धे, पत्रकार उत्तम



बोडखे,पत्रकार अण्णासाहेब साबळे अशोक डोके,हौसराव आजबे,रविंद्र तवले,दत्ताभाऊ सायकड,उत्तम भोगाडे,सुभाष धोंडे,संजय वखरे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी ह.भ.प.पुरी महाराज म्हणाले की,खरी भक्ति कशाला म्हणतात.प्रत्येक जीवमात्रात भगवंत पाहणं ही दृष्टी येणं याला भक्ती म्हणतात.वैराग्य म्हणजे त्याग. कशाचा त्याग घरादाराचा,बायको पोरांचा त्याग करायचा नाही तर अहंकाराचा त्याग केला पाहिजे कारण अहंकार हा अधोगतीला नतो. ज्ञानाला कारण श्रवण आहे.परमार्थ करणं म्हणजे देवाची प्राप्ती करणे नाही. कारण देव प्राप्तच आहे.फक्त जीवनातले अज्ञान गेले की जीव ब्रहरूप आहे याचे ज्ञान होते.देहाचा निरास झाल्याशिवाय ब्रम्हागतीला प्राप्त होवु शकत नाही.

ज्ञानावाचुन भक्ती आंधळी आहे.भक्ति वाचून ज्ञान पांगळं आहे.ज्ञान टिकून राहण्यासाठी वैराग्याची आवश्यकता आहे. ते वैराग्य विवेकासहित असल्यानंतरच टिकून राहते. भक्ति,ज्ञान आणि वैराग्य यातील एकही कमी असेल तर चालत नाही. स्वयंपाकाची सिद्धी जर व्हावयाची असेल तर तीन गोष्टीची आवश्यकता

लागते.उदक म्हणजे पाणी,अग्नि व धान्य या तिन्ही गोष्टीशिवाय स्वयंपाक सिध्दी होणे अशक्य आहे.त्याचप्रमाणे परमार्थिक जीवनात भक्ती,ज्ञान व वैराग्य असणं आवश्यक आहे.भक्ती करणारे खरी करतात की खोटी करतात हे मला चांगलं कळत.आपलं जीवन कृतार्थ,सफल,सार्थकी लावण्यासाठी संतानी सांगीतलेला मार्ग जीवनात अवलंबविला पाहिजे असे ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज सांगितले.देहाचं सार्थक करण्याकरीता जीवनामध्ये भक्तीची आवश्यकता आहे.भक्ती केल्या वाचून आणि साधु संतांची सेवा केल्यावाचून समाधान,सुख,शांती प्राप्त होत नाही.अमूल्य किंमतीचा हा नरदेह कोटी रुपये खर्च करूनसुद्धा पुन्हा प्राप्त होत नाही.जमीन,गेलेले धन हे पुन्हा मिळवता येते पण एकदा शरीर गेलं की पुन्हा शरीर मिळत नाही म्हणून या शरीराकडून भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे.अनंत जन्माच्या पुण्याईने हा देह आपल्याला प्राप्त होतो.काहींना नरदेह मिळाला नाही त्याचे महत्त्वही कळालेले नाही,काहींना नरदेह मिळाला त्याचं महत्त्वही कळालं.काहींना नरदेह मिळाला नाही परंतु त्याचे महत्त्व कळालं आणि आपण संसारी जीव असे आहोत आपल्याला नरदेह प्राप्त झाला.मिळाला परंतु नरदेहाचं महत्त्व आपल्याला कळलेलं नाही म्हणून नको त्या विषयाकडे जीवाची धाव आहे.साधु संतांच्या सहवासामध्ये गेल्यानंतर या जीवाला मी कोण आहे ? मी कुठून आलोय? मला कोठे जायचे ? याची जाणीव संत करून देत असतात.संत सहवासाशिवाय खरे ज्ञान मिळत नाही.संत सहवासाने ब्रम्हज्ञान प्राप्त होते असेही ह.भ.प. श्रीहरि पुरी महाराज म्हणाले.

### ज्येष्ठ नागरिकांना आदरपूर्वक देवदर्शन घडवण्यात आले

# बबन ‘दादा’ शिंदे यांनी स्वतःच्या खर्चाने हा उपक्रम

### राबवला,ज्यामुळे समाजातील ज्येष्ठ व्यक्तींना एक विशेष सेवा मिळाली!

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

संभाजी राजे उद्योग समूहाचे मालक बबन दादा शिंदे यांनी चिखली येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी एक विशेष देवदर्शन उपक्रम आयोजित केला.या उपक्रमात ज्येष्ठ नागरिकांना आदरपूर्वक देवदर्शन घडवण्यात आले.बबन दादा शिंदे यांनी स्वतःच्या खर्चाने हा उपक्रम राबवला,ज्यामुळे समाजातील ज्येष्ठ व्यक्तींना एक विशेष सेवा मिळाली.शिंदे यांचा हा उपक्रम समाजातील वृद्धांच्या कल्याणासाठी एक आदर्श उदाहरण आहे.

आष्टी तालुक्यातील चिखली येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी देवदर्शनाचा विशेष उपक्रम संभाजी राजे उद्योग समूहाचे मालक बबन दादा शिंदे यांनी आयोजित केला होता.या उपक्रमात, ज्येष्ठ नागरिक महादेव देऊजी



शिंदे, नाथा लहानू तांबे,गोविंद काशिनाथ कोकणे,कांता लहानू घुले,दत्तू दगडू शिंदे,हाबीब अगबर पठाण,विठ्ठल काशिनाथ कोकणे,गौतम किसन चखाले यांना देवदर्शन घडवण्यात आले.

बबन दादा शिंदे यांनी या उपक्रमांतर्गत स्वतःच्या खर्चाने ज्येष्ठांना देवदर्शनाची संधी दिली,हा उपक्रम समाजातील ज्येष्ठ व्यक्तींना आदर आणि सेवा देण्याचे एक उत्कृष्ट उदाहरण ठरतो.

# युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था अहिल्यानगर च्या वतीने कार्यशाळेचे आयोजन

**अहिल्यानगर । गणेश गाडेकर**

सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे व विद्यार्थी विकास मंडळ रमेश फिरोदीया कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साकुर यांच्या माध्यमातून शिक्षण व कौशल्य काळाची गरज कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था अहिल्यानगर चे संस्थापक ईश्वर निमसे हे प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कौशल्य स्वयंरोजगाराच्या संधी कौशल्य घेऊन कसे साधता येईल या संदर्भात मार्गदर्शन केले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रम अन त्यातून नोकरी नोकरी साकारणे पलीकडेही विचार करणे गरजेचे आहे सध्या देशाची रोजगाराची परिस्थिती पाहता व्यवसाय मूक शिक्षण कौशल्याच्या जीवावर उपजीविका चालता येणे सहज शक्य आहे त्यासाठी शिक्षणाबरोबर विविध कौशल्य अंगीकारणे गरजेचे आहे ते प्रतिपादन ईश्वर निमसे यांनी केले कार्यशाळेत महाविद्यालयातील जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि भविष्य आणि शिक्षणाबरोबर कौशल्य घेण्याची शपथ घेतली छोटासा स्वयंरोजगार साधून शिक्षणाचा खर्च अभिवचन घेतले. कार्यशाळा संपन्न होण्यास



साठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉक्टर हेमलता राठोड विशेष प्रयत्न केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्राध्यापक रणजीत गिरी सर होते. तसेच कार्यक्रमाची प्रस्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी अध्यापक गणेश साळुंखे सर केले. काय रे शाळेचे सूत्रसंचालन प्राध्यापिका वृषाली डोके यांनी केले यावेळी प्राध्यापक मतू खेमनार तथा विभागीय समन्वयक अहिल्यानगर त्यांनी विद्यार्थ्यांना विविध कौशल्य साधण्यासाठी महाविद्यालयात नियोजन करण्यात आलेले आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक पोपट खेमनार यांनी केले यावेळी युवा उद्योजक अवधूत घोरपडे दत्ता कृपा उद्योग समूह अहिलनगर हे उपस्थित होते.

# बालकांच्या कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**जालना स असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील युनिक पब्लिक स्कूल तर्फे आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक स्नेहसंमेलन सांस्कृतिक कार्यक्रमात बालकलाकारांनी सादर केलेला कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध झाले.कार्यक्रमाची सुरुवात सरपंच अमोलभाऊ देशमुख, आबासाहेब वरखडे, गौतम देशमुख, शेख रहीम, प्रमोद वरखडे, धनंजय देशमुख, विकासराव जाधव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली. त्याप्रसंगी बंडेराव देशमुख, मधुकर देशमुख, ज्ञानेश्वर देशमुख, रमण जाधव,



बंडू गाढे, राजेभाऊ शिंगणे, संजय मांडवे, संतोष गोसावी आदी उपस्थित होते.

बालकलाकारांनी विविध गाण्यावर नृत्य सादर केले. त्यापैकी मै भी रोजे रखुंगा, पुष्पा, मदन मंजिरी, स्वच्छता अभियान व राम आयेंगे आयेंगे या गीतावरील सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष दीपक पवार यांनी केले. सूत्रसंचालन वैष्णवी जनकवार हिने केले तर दीपक पवार यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शितल पवार, सुषमा कपाळे, अर्शिया सय्यद, श्वेता जोशी, वैष्णवी जनकवार, नाजिया खान, सोनाली घोडके, अनंत देशमुख, किरण विभुते, जगदीश घोडके, तथागत जाधव, पवन देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

# कोळगाव अतिक्रमनावर लवकरच हतोडा !

**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

कोळगाव अतिक्रमण लवकरच भुई सपाट. सविस्तर वृत्त असे कि कोळगाव ते श्रीगोंदा रस्ता काम लवकरच चालू होणार असून त्यासाठी रस्ता कडेला असणारे अतिक्रमन हटविण्यासाठी सामाजिक बांधकाम विभाग श्रीगोंदा यांनी अतिक्रमण धारकांना नोटीसा देत सात दिवसात अतिक्रमन काढण्यासाठी मुदत नोटीसी द्वारे देण्यात आली असून समंधित अतिक्रमन धारकांचे चांगलेच धाबे दनानले असून काही व्यवसायिक हे हातावर पोट असणारे असून त्यांच्यासाठी उपासमारीची वेळ येणार आहे तर काही व्यक्तींनी अतिक्रमने करून ते भाडे तत्वावर देऊन भाडे गोळा करत होते त्यांची वर कमाई आता बंद



होणार आहे तर हे अतिक्रमन निघाल्याने शाळकरी मुलांची जाण्या येण्याची सोय होणार आहे या मुळे कही गम तो कही ख़ुशी अशी अवस्था आहे

# राजगुरूनगरच्या अश्विनी राजेंद्र पाचारणे यांना सहकार रत्न पुरस्कार

**पुणे । प्रतिनिधि**

खेड येथील राजगुरुनगर सहकारी बँकेच्या संचालक तसेच शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या पुणे जिल्हाध्यक्ष अश्विनी राजेंद्र पाचारणे यांना नुकताच इचलकरंजी येथील पोलीस मित्र असोसिएशन व वेध फाऊंडेशनच्या वतीने सहकार रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार रविवार दि ९ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे.



अश्विनी राजेंद्र पाचारणे यांचे महिलांच्या सबलीकरणासाठी मोठे योगदान आहे. सामाजिक सांस्कृतिक साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. समाजाच्या उन्नतीसाठी अश्विनीताई सतत कार्यरत असतात तरूणांना उद्योग व्यवसायासाठी मदत करीत असतात. महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांच्या हाताला देवून त्यांचा संसार सुखाचा होण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असतात. राजगुरुनगर सहकारी बँकेच्या माध्यमातून अनेकांना कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांचा व्यवसाय उभारणी साठी मदत करीत असतात. अश्विनीताई पाचारणे यांना जाहीर झालेल्या पुरस्काराचे सर्व थरांत कौतुक होत आहेत अनेकांच्या शुभेच्छा येत आहेत.

### महापारेषणच्या परीक्षेत नागरसोगा गावचे सुपुत्र रोहित सुर्यवंशी राज्यात प्रथम

# रोहित सुर्यवंशी यांनी संघर्षमय प्रवास करत महापारेषण सहाय्यक अभियंता परीक्षेत उज्वल यश संपादण केले!

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील नागरसोगा गावचे सुपुत्र रोहित सूर्यवंशी यांनी दिलेल्या महापारेशन (चडएइ) मध्ये सहाय्यक अभियंता या पदासाठी डिसेंबर मध्ये झालेल्या परीक्षेत घवघवित यश संपादन करत महाराष्ट्रातून पहिला (ठरपज्ञ - १) येण्याचा बहुमान प्राप्त केला ,रोहित सुर्यवंशी हे महापारेशन येथ सहायक अभियंता मनुन राज्यात प्रथम आल्याने यशाबद्धल मायभुमीत नागरसोगा ग्रामपंचायत तर्फे नागरी सत्कार करण्यात आला.लातुर येथे



रोहित सुर्यवंशी यांच्या स्वग्रही आई सुवर्णा सुर्यवंशी वडिल विजयकुमार सुर्यवंशी व बाबा मधुकर सुर्यवंशी यांनी रोहितचे औक्षण करुन पेढे भरवत स्वागत केले ,यावेळी गावचे सरपंच सरोजा भास्कर सूर्यवंशी,उपसरपंच बंडू मसलकर ,ग्रामपंचायत सदस्य भास्कर सुर्यवंशी ,पोलिस पाटील धनंजय सूर्यवंशी, माजी सभापती दत्तोपंत सुर्यवंशी, मुख्याधिकारी गजानन शिंदे ,चेअरमन यशवंत शिंदे सुवर्णा सुर्यवंशी.विजयकुमार सुर्यवंशी ,सोसायटीचे चेअरमन यशवंत शिंदे, शालेय समितीचे अध्यक्ष बबनराजे सूर्यवंशी, अण्णा सूर्यवंशी, धीरज पाटील , महेश साळुंके यावेळी रोहीतचे बाबा मधुकर सूर्यवंशी व वडील विजयकुमार पंडितराव सूर्यवंशी यांचाही यावेळी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतिने सत्कार करण्यात आला .

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077